वाचले :- (१) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
(२) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३
(३) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ३०,३१,३४,४१ व ५१
(४) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५, दि.१३ मार्च, २०२०
(५) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग कडील अधिसुचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८ /आरोग्य ५, दि.१४ मार्च, २०२०

---

अत्यंत महत्वाचे / तातडीचे
कोव्हीड-१९ (प्राथम्य)
ईमेल-rdcsolapur@gmail.com
दूरध्वनी क्र.०२१७-२७३१०२०

जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर
जा.क्र.२०२०/मशा/कार्या/नैआ/जिनिक/प्रक्र-२४/आरआर-५३४
दिनांक २३ एप्रिल, २०२०

---

**विषय :-** सोलापूर शहरातील करोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत सोलापूर शहरामध्ये संचारबंदी लागू करुन शहराच्या सर्व हद्दी बंद करणेबाबत.

**आदेश :-**

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत. तसेच सदरची अधिसूचना वाचले क्र. ५ अन्वये महाराष्ट्र शासनाने दिनांक १४ मार्च २०२० रोजी प्रसिध्द केली आहे.

ज्याअर्थी, सद्यपरिस्थितीत कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. कोरोना विषाणूच्या प्रसाराचे माध्यम पाहता, सदर विषाणुची लागण एका संक्रमीत रुग्णाकडून अन्य व्यक्तीस / इसमास त्याच्या संपर्कात आल्याने होते.

ज्याअर्थी, सध्या सोलापूर शहरामध्ये कोरोना विषाणूमुळे बाधित होणा-या रुग्णाची संख्या दररोज वाढत आहे व सदर विषाणूचा प्रसार रोखणे याकरिता उपाययोजना म्हणून सोलापूर शहरामध्ये संपुर्ण संचारबंदी लागू करुन शहराच्या सर्व हद्दी बंद करणे आवश्यक आहे व याबाबत योग्य ते आदेश निर्गमित करणे आवश्यक असल्याची तशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी मिलिंद शंभरकर, जिल्हादंडाधिकारी तथा पदसिध्द अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन या आदेशाव्दारे दिनांक २४.०४.२०२० रोजी

००.०० वा.पासून ते दि.२७.०४.२०२० रोजीचे रात्रौ २४.०० वाजेपर्यत सोलापूर शहर हद्दीमध्ये खालीलप्रमाणे संपुर्ण संचारबंदी लागू करुन शहरातील सर्व आस्थापना व शहराच्या सर्व हद्दी बंद करण्यात येत आहेत.

**सवलत कालावधी :-**

(i) दिनांक २४.०४.२०२० रोजी सकाळी ८.०० ते दुपारी २.०० या कालावधीत शासन निर्देशानुसार योग्य ते सुरक्षित अंतर **(Social Distancing)** चे पालन करुन नागरीकांना जीवनावश्यक वस्तू उदा.किराणा, दूध, फळे, भाजीपाला, खरेदी करु शकतील.

(ii) तसेच गॅस सिलेंडर्स सेवा उक्त कलावधीत पुरवण्याची मुभा राहील. गॅस सिलेंडर पोचविणाऱ्या यंत्रणेने त्यांच्या कर्मचाऱ्यांना सर्व सुरक्षतेची सर्व सामुग्री व उपकरणे द्यावेत व **(Social Distancing)** कडक पालन करावे.

(iii) नागरीकांनी शक्य तो त्यांचे घराजवळील दुकान, आस्थापना येथूनच जीवनावश्यक वस्तूंची खरेदी करावी. तसेच सुरक्षित अंतर **(Social Distancing)** चे पालन करुन घेण्याची जबाबदारी संबंधित आस्थापना धारकाची राहील.

(iv) वरील सवलत सोलापूर शहरात जाहीर केलेल्या व होणाऱ्या प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) मध्ये लागू राहणार नाही. शहरातील जाहीर करण्यात आलेले प्रतिबंधित क्षेत्र खालील प्रमाणे आहेत. सदर ठिकाणी पूर्वी प्रमाणेच नागरीकांना घरपोच सेवा उपलब्ध करुन देण्यात येईल.

**सोलापूर शहरातील प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone)**

| अ.क्र | प्रतिबंधित क्षेत्र | अ.क्र | प्रतिबंधित क्षेत्र | अ.क्र | प्रतिबंधित क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| (१) | तेलंगी पाच्छा पेठ | (२) | जोशी गल्ली | (३) | इंदिरा नगर |
| (४) | कुर्बान हुसेन नगर | (५) | बापूजी नगर | (६) | जगन्नाथ नगर, शेळगी |
| (७) | मोदी खाना | (८) | शास्त्री नगर | (९) | मदर इंडिया झोपडपट्टी |
| (१०) | शिवगंगा नगर | | | | |

**सदरचा आदेश खालील बाबीस लागु राहणार नाही :-**

१. अत्यावश्यक वैद्यकीय सेवा पुरविणारे खाजगी / सरकारी रुग्णालये, दवाखाने, आरोग्य सेवा देणारे डॉक्टर व वैद्यकीय सेवेशी संबंधीत कर्मचारी व त्याची वाहने, तसेच SARI, ILI व Contact Tracing यासंदर्भात सर्व्हेक्षण करणारे अधिकारी / कर्मचारी.

२. ॲम्ब्युलन्स सेवा.

३. रुग्णालयामध्ये व दवाखान्या संलग्न असणारे औषधांची दुकाने व इतर औषधांची दुकाने त्यांच्या नियमीत वेळेत सुरु राहतील.

४. कायदेशीर कर्तव्य बजावीत असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी उदा. महसूल, पोलीस, पाणीपुरवठा, अग्निशमक, विद्युत पुरवठा विभागातील कार्यरत अधिकारी / कर्मचारी.
५. दुध वाटप सकाळी ६.०० ते ९.०० या कालावधीत वाटप व विक्री करता येईल.
६. शहरातील पेट्रोल पंप सकाळी ७.०० ते ११.०० या कालावधीत सुरु राहतील या कालावधीत केवळ अत्यावश्यक सेवेतील शासकीय वाहने, ॲम्ब्युलन्स, आरोग्य सेवा देणारे डॉक्टर्स व कर्मचारी यांची वाहने तसेच महसूल व पोलीस विभागाच्या वाहनांना पेट्रोल / डिझेल देण्यात येईल.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती / संस्था अथवा संघटना भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) कलम १८८ मधील तरतूदीनुसार दंडनिय / कायदेशीर कारवाईस पात्र असून आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि इतर कायदे आणि विनियम यानुसार कारवाई करणेत येईल. अशा व्यक्ती, संस्था अथवा संघटना यांचेविरुध्द संबंधित पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांनी कारवाई करावी.

**सदरचा आदेश दि.२३/०४/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.**

जिल्हाधिकारी
सोलापूर.

(मिलिंद शंभरकर,भा.प्र.से.)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर**

**प्रति,**

१. पोलीस आयुक्त, सोलापूर शहर
२. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका,सोलापूर.
३. पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण
४. अधिष्ठाता, वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर.
५. जिल्हा शल्यचिकीत्सक, सोलापूर.
६. जिल्हा आरोग्य अधिकारी,सोलापूर.
७. जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर.
८. उपविभागीय दंडाधिकारी सोलापूर विभाग क्र. १ व २
९. तालुका दंडाधिकारी उत्तर सोलापूर / दक्षिण सोलापूर

प्रत :- मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे, यांना माहितीस्तव सविनय सादर.